सर्वोत्तम संस्थेसाठी कॅनडा येथील कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित

ज्ञानगंगा घरोघरी

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक-४२२२२२

Ph. :0253-2230580, http://ycmou.digitaluniversity.ac e-mail : nondani@ycmou.digitaluniversity.ac

नोंदणी कक्ष

जा.क्र. : नोंदणी/२०२१/ S32 दिनांक : १९/०३/२०२१

सूचनापत्र क्र. ३६

ऑनलाईन प्रवेश शुल्क भरण्यास विशेष सवलत.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षासाठी विविध शिक्षणक्रमाचे ऑनलाईन प्रवेश दिनांक २१ जुलै २०२० पासून सुरु झाले होते. ऑनलाईन प्रवेश घेण्यासाठी दिनांक ३१ जानेवारी २०२१ पर्यंत मुदत देण्यात आली होती.

ज्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश अर्ज भरलेला आहे परंतू शिक्षणक्रमाचे विद्यापीठाचे शुल्क भरलेले नाही अशा विद्यार्थ्यांसाठी दिनांक २८/०३/२०२१ पर्यंत विद्यापीठाचे शुल्क भरण्याची विशेष सवलत देण्यात येत आहे. (बी. एड्. व कृषी शिक्षणक्रम, शिक्षणक्रम वगळून)

अभ्यासकेंद्र पडताळणी (Study Center Approval) **पेडींग असलेल्या विद्यार्थ्यांबाबत...**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांसाठी सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश अर्ज सादर करुन शिक्षणक्रम शुल्क विद्यापीठ हिस्सा ऑनलाईन पध्दतीने भरला आहे. सदर विद्यार्थ्यांनी अभ्यासकेंद्राकडून प्रवेशाची पडताळणी योग्य त्या कागदपत्रांच्या आधारे अभ्यासकेंद्राकडून (Study Center Approval) करणे आणि अभ्यासकेंद्र शुल्क भरणे आवश्यक होते. मात्र ही प्रक्रिया अद्यापपर्यंत पुर्ण न केल्यामुळे अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित करता आलेले नाहीत.

अभ्यासकेंद्र मान्यता प्रलंबित असणाऱ्या विद्यार्थ्यांनी संबंधित अभ्यासकेंद्रांशी संपर्क साधून कागदपत्रे तपासून अभ्यासकेंद्र मान्यता (Study Center Approval) करुन घ्यावयाची आहे. सदर प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी अंतिम मुदत दिनांक ३१/०३/२०२१ आहे. दिनांक ३१/०३/२०२१ नंतर अभ्यासकेंद्र मान्यता प्रक्रिया लिंक बंद करण्यात येईल . त्यानंतर अभ्यासकेंद्रास असे प्रवेश मान्य करता येणार नाही.

जे विद्यार्थी सदर प्रक्रिया पूर्ण करणार नाहीत अशांचे प्रवेश निश्चित होणार नाहीत व त्यासंबधीची जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील याची कृपया नोंद घ्यावी.

Vlande 19/03/2021

(श्रीमती. वंदना झेंडे)
सहायक कुलसचिव,
नोंदणी कक्ष. वि.से.वि.

19/3/2021

(डॉ. प्रकाश देशमुख)
संचालक,
विद्यार्थी सेवा विभाग.